# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०३.१०.२०२५ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०२.१०.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये २१ केसेसमध्ये २२ ईसमावर कारवाई करून रू. १,८७,२३५/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून रू. ३,२९०/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण २८२ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. ८३,९००/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :— जिवे ठार मारणारे आरोपी ताब्यात.**

फिर्यादी दुर्गेश लालजी चौव्हाण वय ३६ वर्ष रा. मिनीमाता नगर, गल्ली नं. ६, कळमणा, नागपूर हे काच फिटींगचे काम करीत असुन, त्यांचे सोबत देवेन्द्र अजय चौव्हाण वय २६ वर्ष रा. गाव दयालपूर, पो.स्ट गंभीरपूर, जि. आजमगढ, उत्तर प्रदेश, ह.मु., फिर्यादीचे घरी किरायाने, नागपूर हा मागील ०३ वर्षा पासुन काच फिटींगचे कामात मदत करतो. दिनांक ०२.१०.२०२५ चे २०.४५ वा. ते २१.०० वा. चे सुमारास, फिर्यादी व त्यांचा सोबत देवेन्द्र हे दोघे पोलीस ठाणे कळमणा हद्दीत ईलिमेन्टस हार्मोनी, होम ॲण्ड द डिझाईनर स्टुडीयो ईमारत समोर, मिनीमाता नगर, सार्वजनीक रोडवर दुर्गादेवी विर्सजन रॅली बघण्याकरीता ऊभे असता, तेथे क्र. १) आरोपी आदित्य नितेश चाचेरकर वय २१ वर्ष २) आकाश उर्फ टोचू नितेश चाचेरकर वय २० वर्ष दोन्ही रा. मिनीमाता नगर, कळमणा, नागपूर तसेच त्यांचा मित्र एक विधीसंघर्षग्रस्त बालक हे सुध्दा रॅली बघण्यासाठी ऊभे होते. रॅली बघत असता देवेन्द्रचा धक्का आरोपी क्र. १ आदित्य यास लागल्याचे कारणावरून आरोपींनी संगणमत करून फिर्यादी व त्यांचे सोबत असलेले मित्र यांचे सांबत वादविवाद करून, शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण केली. आरोपी क्र. २ याने देवेन्द्रला पकडून आरोपी क्र. १ याने विधीसंघषग्रस्त बालका कडुन चाकू घेवुन देवेन्द्रचे पसलीवर दोन ते तिन वेळा वार करून गंभीर जखमी करून पळून गेले. लोकांनी जखमी यास उपचाराकरीता रामदेवबाबा हॉस्पीटल, वर्धमान नगर नंतर मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. राऊत ७६२०७३७४५२ यांनी कलम १०३(१), ११५(२), ३५२, ३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, आरोपींचा शोध घेवुन, आरोपी क्र. १ व २ तसेच एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २९.०९.२०२५ चे १४.३० वा. ते दिनांक ०१.१०.२०२५ चे २२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत मठीमंदीर जवळ, यशोधरानगर, कामठी, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी प्रिया सुशांत चवरे, वय ३५ वर्षे हया त्यांचे घराला कुलुप लावुन परिवारासह भंडारा येथे त्यांचे भाऊजीचे सेवानिवृत्तीचे कार्यक्रमाकरीता गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोंडा तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम मधील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागिने वजनी ७१.५ ग्रॅम व चांदीचे दागिने वजनी ३० ग्रॅम असा एकुण २,९०,६००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. पठारे ७५०७०१५५१० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे वाडी :—** दिनांक ०२.१०.२०२५ चे १६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत, दृगधामना गावा मागील खदान, येथे फिर्यादी यांचा चुलत भाऊ नामे यश सुखदेव मोहोळ, वय २३ वर्षे, रा. शिवशक्ती किराणा स्टोअर्स जवळ, दृगधामना वाडी, नागपूर हा आपली दुचाकी गाडी धुण्यासठी खदानचे पाण्यात गेला असता, तेथे पाण्यात काही बदक दिसल्याने तो बदक पकडण्यासाठी पाण्यात थोडा लांब गेल्याने व त्याला पोहता येत नसल्याने तो पाण्यात बुडाला. फिर्यादीचे चुलत भावाचा फायर ब्रिगेडचे मदतीने शोध घेवुन त्याचे प्रेत पाण्याबाहेर काढुन पुढील कारवाईकामी मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी विशाल दिलीप मोहोळ, वय ३१ वर्षे, यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. काळींगे यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतली आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :—** दिनांक ०२.१०.२०२५ चे २०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे वाडी हद्दीत इंडियन पेट्रोल पंप समोर, भारत अपार्टमेंट जवळ एका बंद ऑटोमध्ये एक अन्ना नावाचा अनोळखी ईसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष वयाचे हे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी लक्ष्मण श्यामराव राऊत वय ४२ वर्ष रा. प्लॉट नं. १०४, रघूपती नगर, गणेश चौक, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे वाडी येथे मपोउपनि. कोळी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**